## प्रेसनोट

**आलोसे क्र.०१ श्री.विजय प्रल्हाद खर्चे, वय ५२वर्ष,पद—वरिष्ठ सहाय्यक,प्रभार स्वीय सहाय्यक (स्टेनो)अति मु.का.अ. जि.प.बुलढाणा, वर्ग—३, आलोसे क्र.०२ श्री.सुधिर महादेव तांदुळकर,वय ४२ वर्षे, पद—वरिष्ठ सहाय्यक जि.प.बांधकाम विभाग,बुलढाणा, वर्ग—३, यांनी तक्रारदार यांना ४,०००/— लाचेची मागणी केलेबाबत.**

| अ.क्र. | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| १ | घटक | लाचलचुतपत प्रतिबंधक विभाग, बुलढाणा. |
| २ | तक्रारदार | पुरूष, वय २३ वर्ष, व्यवसाय—खाजगी इंजिनिअर |
| ३ | आरोपी लोकसेवक | **आलोसे क्र.०१** श्री.विजय प्रल्हाद खर्चे, वय ५२वर्ष, व्यवसाय—नोकरी,पद—वरिष्ठ सहाय्यक,प्रभार स्वीय सहाय्यक अति मु.का.अ.जि.प.बुलढाणा, वर्ग—३ रा.व्दारका नगर, पाळणा घरासमोर, बुलढाणा.<br>**आलोसे क्र.०२** श्री.सुधिर महादेव तांदुळकर,वय ४२ वर्षे, व्यवसाय—नोकरी पद—वरिष्ठ सहाय्यक जि.प.बांधकाम विभाग,बुलढाणा, वर्ग—३ रा.बजरंग नगर, जुना अजिसपुर रोड, बुलढाणा. |
| ४ | तक्रार | यातील तक्रारदार यांनी दि.०१.०४.२०२६ रोजी तक्रार दिली की, त्यांचे सुशिक्षित बेरोजगार अभियंता कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यासंबधाने त्यांनी जिल्हा परिषद बांधकाम विभाग बुलढाणा येथे रितसर अर्ज सादर केला होता. सदर प्रमाणपत्र देण्यासाठी जि.प.बुलढाणा बांधकाम विभाग येथील लिपीक श्री.तांदुळकर व जि.प.बुलढाणा येथील स्टेनो श्री.खर्चे हे ५,००० रू.लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार ला.प्र.वि.बुलढाणा घटकाकडे दिली होंती. |
| ५ | तक्रारीची पडताळणी | दि.०१.०४.२०२६ रोजी १३.१३ ते १४.०८ वाजता चे दरम्यान जिल्हा परिषद बांधकाम विभागातील लोकसेवक क्रं.०२ श्री.तांदुळकर लिपीक व जिल्हा परिषद कार्यालय, बुलढाणा येथे लोकसेवक क्रं.०१ श्री.खर्चे,स्टेनो यांची पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदार यांना सुशिक्षित बेरोजगार अभियंता कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र संबधाने श्री.खर्चे (स्टेनो) यांनी त्यांचे कॉबीन मध्ये ५,०००/— रूपये लाचेची मागणी करून लाच स्विकरण्याची समंती दिली त्याचवेळी लोकसेवक क्र. ०२ श्री.तांदुळकर यांनी पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री.खर्चे,स्टेनो यांचेकरिता तडजोडीअंती ४,०००/— रूपये लाच मागणी करून तक्रारदार यांना लोकसेवक श्री. खर्चे स्टेनो यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिल्याचे पडताळणी कार्यवाही दरम्यान निष्पन्न झाले. |
| ६ | सापळा कार्यवाही | दि.०१.०४.२०२६ रोजी १५.४६ ते १७.३६ वा.दरम्यान जिल्हा परिषद,बुलढाणा येथे सापळा कार्यवाही आयोजीत केली असता. लोकसेवक क्र.०१ श्री.खर्चे हे कार्यालयात हजर नसल्याने तक्रारदार यांनी लोकसेवक क्र.०२ श्री.तांदुळकर यांना फोनव्दारे विचारणा केली असता त्यांनी फोनवर बोलण्यास टाळाटाळ करुन तक्रारदारावर संशय आल्याने तक्रारदार यांचे कंत्राटदाराचे नोदणी प्रमाणपत्र कार्यालयाबाहेर आणून दिले व तुमचे काम झाले असे सांगुन संशय आल्याने लाच रक्कम स्विकारली नाही.<br>दि.०२.०६.२०२६ रोजी पुन्हा सापळा कार्यवाही आयोजीत केली असता लोकसेवक क्र.०१ श्री.खर्चे हे कार्यालयात हजर मिळून न आल्याने तक्रारदार यांनी फोनव्दारे विचारणा केली असता लोकसेवक श्री. खर्चे यांनी सांगीतले कि माझ्याकडे तुमची कोणतीच फाईल नाही. मी बाहेर आहे असे म्हणून तक्रारदार यांची भेट घेण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक श्री.खर्चे व श्री. तांदुळकर यांनी कोणत्याच प्रकारचा संपर्क न केल्याने लोकसेवक यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने मागणी केलेली लाच रक्कम स्विकारणार नसल्याची खात्री झाल्याने तक्रारदार यांना सुशिक्षित बेरोजगार अभियंता कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र संबधाने ५,०००/— रूपये लाचेची मागणी करून लाच स्विकरण्याची समंती दिली त्याचवेळी लोकसेवक क्र.०२ श्री.तांदुळकर यांनी पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री. खर्चे,स्टेनो यांचेकरिता तडजोडीअंती ४,०००/— रूपये लाच मागणी करून तक्रारदार यांना लोकसेवक श्री.खर्चे स्टेनो यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. |
| ७ | गुन्हा रजिष्टर नंबर / कलम / पोस्टे / जिल्हा / दि. व वेळ | पोलीस स्टेशन बुलढाणा शहर जि.बुलढाणा अप क्र.१०२३/२०२६ कलम ७,१२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ प्रमाणे दि.१६.१०.२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

| | | |
|---|---|---|
| ८ | आरोपी अटक दि.वेळ | आज दि.१६.१०.२०२६ रोजी लोकसेवक क्र.०१ श्री.विजय खर्चे व लोकसेवक क्र. ०२ श्री.सुधीर तांदुळकर यांना त्यांचे कार्यालयातुन ताब्यात घेण्यात आले असून त्यांना अटक करण्याची कार्यवाही सुरू आहे. |
| ९ | सापळा अधिकारी | श्री.विलास गुसिंगे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि बुलढाणा. |
| १० | पर्यवेक्षक अधिकारी | श्री.भागोजी चोरमले, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि, बुलढाणा. |
| ११ | सापळा पथक | श्री.भागोजी चोरमले, पोलीस उपअधिक्षक,श्री.विलास गुसिंगे,पोलीस निरीक्षक,पोहेकॉ प्रविण बैरागी, अमोल झिने,दिपक जाधव, जगदीश पवार,पोकॉ. लक्ष्मीकांत इंगळे,रतन गिरी,गजानन गाल्डे, शैलेश सोनवणे, पंढरी शेळके, रजिंत व्यवहारे, प्रफुल्ल आमले, चापोकॉ अर्शद शेख लाप्रवि बुलढाणा घटक |
| १२ | मार्गदर्शन | मा.श्री.बापू बांगर,पोलीस अधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो,अमरावती,परिक्षेत्र अमरावती मों.नं.९०११३२३४२६<br>मा.श्री.सुनिल किनंगे, अपर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,अमरावती,परिक्षेत्र अमरावती मों.नं.९८२३१११११५५<br>मा.श्री.भागोजी चोरमले, पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा मों.नं.९५५२५२०१८८ |

**१३**.लाचलचुपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबधी काही माहीती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका विरूध्द तक्रार असल्यास लाचलचुपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमूद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

| कार्यालय | घटक कार्यालय | परिक्षेत्र कार्यालय | ला.प्र.वि.मुख्यालय |
|---|---|---|---|
| पत्ता | ला.प्र.वि.कार्यालय,जिल्हा कारागृह,जवळ, जुने उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय,बुलढाणा | मा.पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. अमरावती परिक्षेत्र, अमरावती कार्यालय, पराजंपे कॉलनी,कॅम्प अमरावती | मा.महासचांलक, लाप्रवि, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई –४०००३० |
| दूरध्वनी क्रमाक व व्हॉटसअप क्रमांक टोल फ्री क्रमांक | ०७२६२–२४२५४८<br>९४०५०९१०६४<br>१०६४ | ०७२१–२५५३०५५<br><br>१०६४ | ०२२–२४९२१२१२<br><br>१०६४ |
| ई–मेल आयडी | dyspacbbuldhana @mahapolice.gov.in | spacb.amrawati@mahapolice.gov.in | acbwebmail@mahapolice.gov.in |

( भागोजी चोरमले )
पोलीस उपअधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा